प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०६ सप्टेंबर २०२१**

## सिडकोच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेकरिता अर्ज करण्याकरिता १ महिन्याची मुदतवाढ

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीकरिता नागरिकांच्या विनंतीस मान देऊन सदर योजनेस १ महिन्याची म्हणजेच ७ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला असून या अनुषंगाने अनामत रक्कम व शुल्क भरणा, संगणकीय सोडत या प्रक्रियांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे.

**"कोविड संबंधी कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ती कागदपत्रे जमा करण्यास पुरेसा अवधी मिळावा, याकरिता इच्छुक अर्जदारांच्या विनंतीस मान देऊन या विशेष गृहनिर्माण योजनेच्या अर्ज नोंदणीस १ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. अधिकाधिक कोविड योद्ध्यांना व गणवेषधारी कर्मचाऱ्यांना योजनेकरिता अर्ज करता यावा व त्यांचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे याकरिता हा निर्णय घेण्यात आला आहे. "**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

कोविड-१९ महासाथीच्या काळात आपल्या प्राणांची पर्वा न करता डॉक्टर, परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी, पोलीस, सफाई कर्मचारी आणि अन्य अत्यावश्यक सेवांमधील कर्मचाऱ्यांनी अविरपणे आपले कर्तव्य बजावले. कोविड योद्धे बनून, आपल्या जीवाची पर्वा न करता त्यांनी समाजाप्रतिचे आपले कर्तव्य अव्याहतपणे पार पाडले. या कोविड योद्ध्यांमुळे मोठ्या प्रमाणावर होणारी संभाव्य प्राणहानी टळली तसेच अत्यावश्यक सेवांचा नागरिकांना अविरतपणे पुरवठा होत राहिला. या कोविड योद्ध्यांप्रति कृतज्ञतेची भावना म्हणून या योद्ध्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडकोने या गृहनिर्माण या योजनेचा १५ ऑगस्ट २०२१ रोजी प्रारंभ केला.

सदर गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोड्समध्ये ४,४८८ घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकूण ४,४८८ घरांपैकी १,०८८ घरे ही प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी (ईडब्लूएस) आणि उर्वरित ३,४०० घरे सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत. तसेच वैधानिक तरतुदींनुसार काही घरे ही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, दिव्यांग प्रवर्गांकरिता राखीव आहेत.

इच्छुक अर्जदारांना योग्य ती कागदपत्रे जमा करण्यासाठी अर्ज नोंदणीस मुदतवाढ देण्याची मागणी संबंधितांकडून करण्यात येत होती. या बाबींचा विचार करून सिडकोने या विशेष गृहनिर्माण योजनेतील ऑनलाइन अर्ज नोंदणीसह अन्य सर्व प्रक्रियांना १ महिन्याची म्हणजेच ७ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. दिलेल्या मुदतवाढीचा लाभ घेऊन अधिकाधिक कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांनी या गृहनिर्माण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**